# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : २५/०४/२०२३

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

कोरोना काळामधील अनेक दुर्घटना पैकी आशा ईमारत उल्हासनगर -१ येथील वर्दीवर आपल्या प्राणांची बाजी लावणार अग्निशमन दलातील कर्मचारी यांना केंद्रिय गृह राज्यमंत्री भारत सरकार श्री. नित्यानंद राय यांचे शुभ हस्ते राष्ट्रीय अग्निशमन महाविद्यालय नागपूर येथील ऑडिटोरियम मध्ये राष्ट्रपती अग्निशमन शौर्य पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. गेल्या दोन वर्षापासुन कोविडच्या कारणामुळे राष्ट्रपती शौर्य पुरस्कोराचा वितरण सोहळा प्रलंबित होता, मात्र सोमवार दिनांक १७/०४/२०२३ रोजी राष्ट्रीय अग्निशमन प्रशिक्षण महाविद्यालय नागपूर येथे संपूर्ण भारतामधुन अग्निशमन सेवेतील राष्ट्रपती शौर्य पुरस्कार विजेत्यांचा पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करणेत आलेला होता.

१५ ऑगस्ट २०२० रोजी जाहीर करण्यात आलेला शौर्य पुरस्कार त्यामध्ये उल्हासनगर महानगरपालिका अग्निशमन दलातील ०४ जवान श्री. बाळासाहेब नेटके, श्री. पंकज पवार, श्री. संदिप आसेकर, श्री. राजेंद्र राजम यांना मा. श्री. नित्यानंद राय केंद्रीय गृह राज्य मंत्री (भारत सरकार) गृहमंत्रालय दिल्ली, यांचे शुभ हस्ते राष्ट्रपती शौर्य पुरस्कार (राष्ट्रपती पदक) प्रदान करुन सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमास मा. श्री. ताज हसन महासंचालक अग्निशमन सेवा (भारत सरकार), मा. श्री. कुडकीलवार उप-अग्निनशमन सल्लागार (भारत सरकार), श्री. आर.एम.क्षीरसागर मा. संचालक राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय नागपूर, श्री, राजेश चौधरी मा. उप संचालक राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय नागपूर, तसेच विविध राज्यातील मा. आजी माजी संचालक व श्री. संतोष वारीक मा. संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा (महाराष्ट्र राज्य) उपस्थित होते.

उल्हासनगर महानगरपालिका अग्निशमन सेवेतील ०४ जवानांना राष्ट्रपती शौर्य पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल मा. प्रशासक तथा आयुक्त सो श्री अजीज शेख यांनी दिनांक २४/४/२०२३ रोजी उल्हासनगर महापालिका मा. स्थायी समिती सभागृहात विभागप्रुखांच्या बैठकीमध्ये जवानांचे प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले प्रसंगी डॉ करूणा जुईकर अतिरिक्त आयुक्त (सेवा), श्री अशोक नाईकवाडे उप आयुक्त (मुख्यालय) डॉ श्री सुभाष जाधव उप आयुक्त् (आरोग्य), श्री किरण भिलारे (मुख्या लेखा अधिकारी) व महापालिकेतील इतर विभागप्रमुख हजर होते.

जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत –माहितीस्तव सादर.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१. पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२. सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
सदरची प्रेसनोट उल्हासनगर महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.